# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक १५.१०.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १४.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमावर कारवाई करून एकुण १,६५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०२ केसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण २,१५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक १४.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १५.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये १० ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ७३ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ८१ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २३२ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १४५ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ७० केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १६८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०६ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०५ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८९५ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ३२ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २४ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,८४४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ७,६२,६५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.१०.२०२६ चे रात्रीदरम्यान, गुन्हेशाखेचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, ऋतुराज टाऊन, भिलगांव येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) विनीत विनोद मेहरूनिया, वय ३२ वर्षे, रा. येरखेडा, लोधीपुरा, माता मंदीर जवळ, नविन कामठी, नागपुर २) शाहरूख अन्सारी अब्दुल जब्बार अन्सारी, वय ३९ वर्षे, रा. पिवळी हवेली, रब्बानी शाळेजवळ, जुनी कामठी, नागपुर ३) अस्मीत रितेश चरोटे, वय २१ वर्षे, रा. रमाई नगर, प्लॉट नं. १५५, नारी रोड, कपीलनगर, नागपुर ४) राहुल अशोक धामती, वय ३४ वर्षे, ५) कुणाल उर्फ गोलु अशोक धामती, वय ३८ वर्षे, दोघेही रा. ऋतुराज टाऊन, प्लॉट नं. ५३, यशोधरानगर, नागपुर,

६) अश्वीन तुलाराम गवारे, वय ४० वर्षे, रा. हिंगणा, वैशाली नगर, सिआरपिएफ गेट जवळ, एमआयडीसी, नागपुर ७) अरूण राम कुशवाह, वय ३४ वर्षे, रा. हिवरखेडा, मराठाटोली, ताज हॉटेल समोर, नविन कामठी, नागपुर ८) प्रतीक संतोष सानेवणे, वय ३१ वर्षे, रा. मेहतेपार, तह. तिरोडा, जि. बालाघाट (मध्य प्रदेश) हे ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींना ताब्यात घेवुन, त्यांचे ताब्यातुन रोख २६,८८०/–रू., वेगवेगळ्या कंपनीचे ०७ मोबाईल फोन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण ८७,४८०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १२(ब), ३, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास यशोधरानगर पोलीस करीत आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा घरफोडी चोरी विरोधी पथक, खंडणी विरोधी पथक, युनिट क्र. ३, युनिट क्र. ५ आणि वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्तीकरित्या केली.



**<u>२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :– अवैधरित्या विक्रीकरीता गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १४.१०.२०२६ चे २२.०० वा. ते २३.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत कामगार नगर, रिंग रोड लगत, इंडीयन ऑईल पेट्रोल पंप जवळील असलेल्या नाल्याचे बाजुचे एका टिनाचे शेडसमोरील मोकळ्या जागेत, एक ईसम गांजा विक्री करता उभा आहे. अशा सुचनेवरून, नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसुन आला. त्यास ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव महेश श्रीराम सांगोळे, वय ४० वर्षे, रा. तक्षशिला नगर घाट जवळ, नारी गांव, कपीलनगर, नागपूर असे सांगितले. एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करुन, त्याची झडती घेतली असता, त्याचे ताब्यात हिरव्या रंगाचा उग्रवास असलेला गांजा अंमली पदार्थ एकुण वजनी १ किलो ३०० ग्रॅम किमती ६५,०००/– रु. चा मिळुन आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद गांजा हा त्याचा साथीदार पाहीजे आरोपी १) मिराज अली उर्फ पप्पु मोहम्मद युनुस अन्सारी, रा. कामगार नगर, नागपुर २) नदीम उर्फ बाबा अन्सारी तसेच ३) बबलु नावाचा ईसम यांचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे

सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन गांजा व एक मोबाईल फोन असा एकुण ७५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीज आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर, पोहवा. रत्नाकर कोठे, पवन गजभिये, पोअं. धनपत मंझरेटे व मपोहवा. लता नारनवरे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे अंबाझरी :—शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १५.१०.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, कॅम्पस परिसर रोडचे बाजुला, आयकॉन हॉस्पीटल जवळील फुटपाथवर एक पांढरा शर्ट व काळा पॅन्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम शिवीगाळ करतांना दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळु पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु किंमती २००/— रू. काढुन घेवुन, जप्त करण्यात आला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुरज रामदास आत्राम, वय ४० वर्षे, रा. गोंडबोला वस्ती, फुटाळा, अंबाझरी, नागपूर असे सांगीतले.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोहवा. शत्रुघ्न मुंढे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. नंदकिशोर पदकोंडे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बजाजनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी संजय भिमरावजी हिवसे, वय ५१ वर्षे, रा. अश्वमेध अपार्टमेंट, लेंड्रा पार्क, रामदासपेठ, प्लॉट नागपुर यांचे पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत प्लॉट नं. ३५, अभ्यंकर नगर येथे आर्किटेक्ट चे कार्यालय आहे. दिनांक १३.१०.२०२६ चे १८.३० वा. ते दि. १४.१०.२०२६ चे ०९.४५ वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे ऑफीसचे लाकडी दाराचे कडी—कोंडा व कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, तसेच शेजारी असलेले ट्री—रियल मार्क्स या कार्यालयाचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, दोन्ही कार्यालयातील रोख ४०,०००/—रू, ०३ लॅपटॉप, संगणक, मॉनिटर, कि—बोर्ड, माऊस, ०२ सिसिटीव्ही कॅमेरेचे डिव्हीआर असा एकुण किंमती २,०२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे मसपोनि. धनश्री डहाके ९९७५४१९६२३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** दिनांक १४.१०.२०२६ चे ०६.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत बेसा—पिपळा रोड, झुडीओ शॉप जवळ, लक्ष्मी किराणा स्टोअर्स समोर एक ईसम अपघात होवुन बेशुध्द पडलेला आहे, अशा नियंत्रण कक्षाकडुन प्राप्त सुचनेवरून, हुडकेश्वर पोलीस तेथे गेले असता, त्यांना मोटारसायकलवरील एक ईसम नामे दिपक श्रीकांत व्यवहारे, वय ३७ वर्षे, रा. घोटाळ पांजरी, ग्रीन सिटी, नागपुर हे जखमी व बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यापकरणी सरतर्फे फिर्यादी पोअं. दिनेश फुलझेले, हुडकेश्वर यांनी दिलेल्या सुचनेवरून, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सफौ. विलास बागडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे धंतोली :—** दिनांक १४.१०.२०२६ चे २०.०० वा. चे पुर्वी, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, नागपुर—मुंबई अप रेल्वे लाईन, पोल क्र. ८३२/२९ ते ८३२/३१ दरम्यान असलेल्या, काटेरी कम्पाऊंडमध्ये एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्षे वयाचे, उंची ५ फुट २ इंच, बांध मध्यम, डोक्याचे केस काळे—पांढरे, दाढी बारीक, मिशी वाढलेली, अंगात क्रीम रंगाची बनियान, निळ्या रंगाची लुंगी घातलेली असुन, सर्व अंगाला किडे लागलेले व कुजलेल्या अवस्थेत प्रेत मिळुन आले. धंतोली पोलीसांनी कारवाई करून, प्रेत पुढील कार्यवाहीस्तव मेडीकल हॉस्पीटल येथे पाठविले आहे. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद वर्णनावरून मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे धंतोली येथे संपर्क साधावा.

यापकरणी पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि. शकुंतला गोबाळे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसींग)**

**पोलीस ठाणे नंदनवन :—** फिर्यादी श्रीमती शितल शिवाजी नंदागवळी, वय ३३ वर्षे, रा. गल्ली नं. ४, राजेंद्र नगर, नंदनवन, नागपुर यांनी पोलीस ठाणे नंदनवन येथे तक्रार दिली की, त्यांची बहीण श्रीमती निलीमा राजु हातमोडे, वय ४० वर्षे ह्या दिनांक ०३.१०.२०२६ चे ०७.३० वा. पासुन बेपत्ता आहेत. शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे, अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १४०(३) भा.न्या.सं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, केस—काळे लांब, अंगात—हिरव्या रंगाचा स्कार्फ व पोपटी रंगाची कुर्ती घातलेले आहे. भाषा—मराठी, हिंदी बोलतात.



निलीमा

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**